**सरकारपक्षा तर्फे शपथेवर साक्षीदार क्रमांक ०१ यांची पुढील**

**उलटतपासणी आरोपी क्रमांक १ तर्फे ॲड.पी.बी.राख**

१९. हे म्हणणे खरे आहे की माझे मुलाच्या मृत्यूनंतर मी माझी बहीण शामल हरीशचंद्र कवठेकर हिस एक एकर जमीन दिली. तसेच दुसरी बहीण कांता दगडु बहीर हिला गट क्र.२५५ मधील २० गुंठे जमीन दिली. हे म्हणणे खरे आहे की मुलाच्या विक्री नंतर मी माझे शेजारी इंदोरे यांना सुध्दा काही जमीन विकली. हे म्हणणे खरे आहे की सन २०१३ साली माझे दुस—या पत्नीला गट नं.२५५ मध्ये ४२ आर जमीन दिली. हे म्हणणे खरे आहे की सन २०१० पुर्वी मी माझे दोन्ही मुलांना प्रत्येकी दोन एकर जमीन वाटप करुन दिली होती. हे म्हणणे खरे आहे की माझे नातींना अर्चना व तिचे आई—वडील सांभाळतात. हे म्हणणे खरे नाही की अनिलच्या मृत्यूनंतर मी दोन्ही नातींसाठी पाच पैशाची सुध्दा मनी ऑर्डर केली नाही. साक्षीदार सांगतो की मी चाळीस हजार जमा केले.

प्रश्न : तुम्ही दोन्ही मुलींच्या नावाने सदर रक्कमेची एफ.डी केली का?

उत्तर : पाहुण्यांनी पैशे नेवुन एफ.डी केली.

२०. मी त्या बॅकेचे नाव तसेच एफ.डी. चा तपशील सांगु शकत नाही तसेच ती पावती सुध्दा दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी माझे नातीच्या नावे सदरची रक्कम एफ.डी मध्ये ठेवली हे मी खोटे सांगतो. मला माझे दोन्ही नातींच्या वाढदिवसाची तारीख सांगता येत नाही. माझे पहिली पत्नीची सासरवाडी चौसाळा येथे तांदळवाडी घाट ही होती. हे म्हणणे खरे नाही की माझे पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर तिच्या माहेरच्या लोकांचा माझा काही संबंध राहीला नाही. मयत अनिल हा त्याच्या मामाच्या गावी जात होता. अर्चना नांदायला आली नाही म्हणुन आम्ही तिला नोटीस पाठवली नव्हती. अर्चना अनिल मेल्यानंतर मी नांदायला येईल असे म्हणाल्याबाबत मी तक्रार दिली नव्हती. मी तिच्या गावच्या पोलीस पाटील तसेच आमच्या गावचे पोलीस पाटील यांचेकडे तक्रार दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मी दिनांक १४.०६.२०२० रोजी अर्चना कडे गेलो नव्हतो.

२१. हे म्हणणे खरे नाही की मी घटनेच्या दिवशी अनिलचा मोबाईल घेतला होता. साक्षीदार सांगतो की अनिलकडे मोबाईल नव्हता. मला अनिलचा मोबाईल पोलीसांनी जप्त केला होता किंवा कसे याबाबत माहीती नाही.

२२. हे म्हणणे खरे आहे की आता मला दाखविण्यात आलेल्या **आर्टीकल 'डी'** वरील फोटोमध्ये अनिलचे प्रेत दोरीला लटकलेले दिसते व त्या फोटोमध्ये दोरी व वायर दोन्ही दिसत आहे. आरोपीचे विधीज्ञांनी सदर फोटो उलटतपासणीमध्ये साक्षीदारास दाखवुन त्याकडे लक्ष वेधल्यामुळे सदर फोटोस **निशाणी क्र.४८** देण्यात येते.

२३. हे म्हणणे खरे आहे की माझा मुलगा माझे सारखा धष्ठ पुष्ठ व उंच होता. हे म्हणणे खरे आहे की माझा मुलगा व्यसनाच्या आहारी गेला म्हणुन मी त्याचे उपचार कोणत्याही डॉक्टरांकडे केले नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे मुलाला अर्चना हिने डॉ. बारकुल, कृष्णा हॉस्पीटल, वेदीका हॉस्पीटल इत्यादी हॉस्पीटलमध्ये उपचारासाठी नेले होते. हे म्हणणे खरे आहे की माझे मुलाला शासकीय नौकरी लागली नाही. हे म्हणणे खरे आहे की तो खाजगी नौकरी म्हणजे गाडे शिक्षकाच्या जागेवर चिंचोलीच्या शाळेवर सन २०१६ साली जात होता. हे म्हणणे खरे आहे की सुरवातीपासुनच अनिल यास उत्पन्नाचे शेती व्यतिरिक्त स्वतंत्र ठोस साधन नव्हते.

२४. हे म्हणणे खरे आहे की माझे दुस—या मुलगा गणेशचे लग्न मे २०१८ मध्ये झाले होते व त्यानंतर दोन्ही मुले स्वतंत्र राहत होती. हे म्हणणे खरे नाही की घराचा प्रमुख म्हणुन सर्व शेतीचे उत्पन्न माझेकडे येत होते. हे म्हणणे खरे नाही की मी अनिल यास खर्चासाठी पैशे देत नव्हतो.

२५. हे म्हणणे खरे आहे की अनिल यास दुसरी मुलगी आदिती सन २०१५ साली झाली त्यावेळी मला त्याला मुलगा व्हावा असे वाटत होते. हे म्हणणे खरे नाही की अनिल यास दोन्ही मुली झाल्या म्हणुन मी व माझी पत्नी अनिल यास सारखे टोचुन बोलत होतो. हे म्हणणे खरे नाही की अनिल यास त्याला दोन्ही मुली झाल्या तसेच त्यास नौकरी लागली नाही म्हणुन तो सतत

नैराश्यात होता.

२६. हे म्हणणे खरे नाही की अर्चना हिने तिच्या वडीलांकडुन सन २०१८ मध्ये पैसे घेवुन अनिल यास नवीन ॲटो रिक्षा घेवुन दिला होता. हे म्हणणे खरे नाही की अमोल जमदाडे याचेकडुन पैसे घेवुन यापुर्वी एक ॲटोरिक्षा सन २०१८ पुर्वी अर्चना व तिचे आई—वडीलांनी अनिल यास घेवुन दिला होता. हे म्हणणे खरे नाही की अनिल यास उत्पन्न नसल्याने तो नेहमी पैशाच्या चणचणीत असायचा. हे म्हणणे खरे नाही की तो सतत दारु पिण्यासाठी अर्चनाकडे पैसे मागुन तिस मारहाण करीत होता. हे म्हणणे खरे नाही की अनिल हा अत्यंत व्यसनाधिन झाल्याने अर्चना हिचे पुर्ण दागिने विकले होते. हे म्हणणे खरे आहे की सन मार्च २०२० मध्ये लॉकडाउन लागले होते. हे म्हणणे खरे नाही की सन २०२० पासुन अनिलचे व्यसन वाढले होते. हे म्हणणे खरे नाही की अनिलने अर्चना हिस दिनांक १०.०२.२०२० रोजी मारहाण केली होती त्यामुळे अर्चना हिने ग्रामीण पोलीस ठाणे येथे अनिल विरुध्द दिनांक ११.०२.२०२० रोजी गु.नों.क्र. ४०/२०२० असा होता. हे म्हणणे खरे नाही की अत्याधिक व्यसनामुळे अनिलचे मानसिक संतुलन बिघडले होते.

२७. हे म्हणणे खरे नाही की मार्च—२०२० मध्ये अनिलने घरातील टी.व्ही, फ्रिज वगैरे सर्व साहित्य फोडुन टाकले होते. हे म्हणणे खरे नाही की त्याच दिवशी अनिलने अर्चना हिला प्रचंड मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी ग्रामीण पोलीस ठाणे येथील पोलीस कॉ. श्री. जरे यांनी अर्चनाला कसेबसे सोडवुन तिला माहेरी पाठवुन दिले होते.

२८. हे म्हणणे खरे नाही की दिनांक १७.०३.२०२० रोजी अनिलचे व्यसन हद्दीबाहेर गेल्यामुळे अनिलच्या मित्रांनी अर्चनाच्या नावे बक्षिसपत्र क्र. १२०५/२०२० हे करुन घेतले होते. साक्षीदार सांगतो की त्यांनी बळजबरीने रजिस्ट्री करुन घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की दिनांक १३.०२.२०२० रोजी मी जमीन विक्री करु नये म्हणुन अर्चनाने तहसीलदार बीड यांना अर्ज दिला होता.

२९. हे म्हणणे खरे नाही की मला कधी थकवा आला तर मी दारु पितो. हे म्हणणे खरे नाही की मी व अनिल दोघे मिळुन घरात दारु पित होतो. मी अर्चनाने कपडे जाळले म्हणुन पोलीस ठाणे येथे तक्रार दिली नव्हती. साक्षीदार सांगतो की शुल्लक गोष्ट होती. मला अर्चनाने नववी पास होवुन दहावी मध्ये प्रवेश घेतल्याबाबतची माहीती नाही. अर्चनाच्या घरच्यांनी तिचे खोटे शिक्षण दाखवल्याबाबत आम्ही तिच्या घरच्यांच्या विरुध्द फसवणुकीची केस केली नव्हती.

३०. हे म्हणणे खरे नाही की अर्जुन नवले यांनी मी त्यांना माझा मोबाईल नं.९३५६२९७८३६ या नंबर वरुन त्यांना शिवीगाळ केल्याबाबत पेठ बीड पोलीस ठाणे येथे तक्रार नं.६०८/२०२३ दिली होती. मला माझी नाती कोणत्या शाळेत शिकतात हे माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की अर्चना, अर्चनाचे आई—वडील व त्याचे नातेवाईक हे सर्व जण अनिलच्या अंत्यविधीला आले होते त्यावेळी मी त्यांना शिवीगाळ केली होती.

३१. हे म्हणणे खरे नाही की लग्न झाल्यापासुन अनिल व त्याच्या पत्नीचे भांडण होत होते, ती माहेरी जात होती तसेच आम्ही तिला आणायला जायचो, ती वडीलांना मामाला फोन करायची इत्यादी सर्व सरतपासणीतील मजकुर मी खोटा सांगतो.

३२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १४.०६.२०२० रोजी मी तिली आणायला गेलो परंतु तिचे वडील म्हणाले आम्ही पाठवत नाही मामाकडे जा, तसेच अर्चनाने अनिल मेल्यावर येतो असे म्हणाली व दोन एकर शेती नावावर करुन घेतली तसेच तिने मुलाला शेतात येवु नको असे सांगितले त्यामुळे तो खचला व तिने त्रास दिला व तिच्या त्रासामुळे माझे मुलाने आत्महत्या केली इत्यादी सर्व मजकुर मी खोटा सांगतो.

३३. हे म्हणणे खरे नाही की अनिलने जिन्यावर चिठ्ठीवर लिहुन ठेवली होती तसेच हातावर लिहुन ठेवले होते वगैरे सर्व सरतपासणीतील सर्व मजकुर मी खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की अनिलच्या मृत्यूला मी व माझे कुटूंबीय जबाबदार आहे.

३४. हे म्हणणे खरे नाही की अनिलच्या नावाने जी चिठ्ठी आहे त्यातील सर्व मजकुर मी तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की माझे सुनेला जमीनीत हिस्सा मिळु नये असे मला वाटते व त्यामुळे मी माझे नातेवाईकांच्या नावावर जमीन केली आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी माझे मुलाला त्रास दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की माझे सुनेला जमीनीत हिस्सा मिळु नये म्हणुन मी तिच्यावर खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की अनिलच्या मृत्यूनंतर माझे सर्व नातेवाईक जमा झाले होते. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर आम्ही सर्वांनी विचार विनीमय करुन खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,
RENUKA MANIKRAO SATAV
Digitally signed by RENUKA MANIKRAO SATAV
Date: 2026.04.01 18:10:11 +0530
**( रेणूका मा. सातव )**
अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बीड

दिनांक : ०१/०४/२०२६